# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

**YEAR : 38)** **1st May 2013 (No. of Pages 8 )** **( No : 06**


## *दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी शासनाने घेतलेल्या निर्णयातील बेकायदेशीर व क्रौर्यपूर्ण विषारी कृतींच्या माघारीनंतरच आंदोलनाच्या माघारीचा विचार होवू शकतो*

"१५०० कोटी रूपये केंद्र शासन देण्यास तयार असतांना गेल्या अनेक महिन्यापासून या प्रश्नाकडे शासनाचे सातत्त्याने दुर्लक्ष झाले. आता ३० एप्रिल २०१३ पर्यंत थकबाकीची ही सर्व रक्कम प्रत्यक्षात अदा केली जाईल असे जाहिरपणे मा. उच्च शिक्षणमंत्री सांगत आहेत ते खरे मानले तरी **दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी शासनाने नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयातील बेकायदेशीर व क्रौर्यपूर्ण विषारी कृतींच्या माघारीनंतरच आंदोलनाच्या माघारीचा विचार होवू शकतो.** आणखी महत्त्वाची बाब म्हणजे मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या अनेक निर्णयांच्या बाबत अनेक खंडपीठांनी अनेकदा निर्णय देवून अनेक महिने त्याची अंमलबजावणी होत नाही ही गोष्ट गांभीर्याने घेण्याची असून कोणत्याही शासनाची प्रतिष्ठा वाढविणारी नाही. आंदोलनाच्या मागणीपत्रात ही बाब समाविष्ट करावी लागणे हे दुर्दैवी असले तरी शासन अजूनही त्याबाबत काहीच कारवाई करीत नाही हे अति दुर्दैवी होय."

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेल्या ठरावाचा परिच्छेद ११ पहा (संपूर्ण ठराव याच अंकात पृष्ठ ५५ वर प्रसृत केला आहे.)

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

### ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

**WRIT PETITION (LODING) NO.1326 OF 2012**

Akhil Bharatiya Vidyarthi Parishad and another... ***Petitioners*** **Vs.** The State of Maharashtra and others) ... ***Respondents***

Mr. Uday P Warunjikar for the Petitioners. : Mr. J.S.Saluja, Assistant Government pleader, for Respondent No. 1 State : Mr. C.R. Sadashivan i/b N.M.Ganguli for Respondent No. 2 : Mr. Rui Rodrigues for Respondent Nos. 3 and 12 and 13. : Mr. P.N.Joshi with Mr. I.M.Khairdi for Respondent No. 5 : Mr. S.B. Shenoy i/b A.S. Karwande for Respondent No. 9 : Mr. Ramesh N. Zade, President, National forum for Quality Education.

Coram : Mohit S. Shah C.J. & M.S. Sanklecha J.

Date 18 April 2013

**P.C. :-** Mr. Saluja learned Assistant Government pleader, appearing for respondent no. 1 state of Maharashtra, States under instructions of Mr. R.G. Jadhav, Joint Secretary, Higher & Technical Education Department, Government of Maharashtra, that the State Government is ready to discuss the demands of respondent no. 2 Maharashtra Federation of University College Teachers Organisation.

2, In view of the above, learned counsel for respondent no. 2 Maharashtra Federation of University College Teachers Organisation State that the members of respondent no. 2 organisation are not preventing any teachers form going for assessment work or any other examination related work.

3. It appears that there are 2877 teachers (Assistant Professors) who were appointed during the period from 19th September 1991 to 3rd April 2000 but who did not have the qualification of NET/SET. **It appears that the University Grants Commission has already taken decision on 16 th April 2011 and 15th March 2012 that the university may grant exemption to such teachers from the requirement of NET/SET provided their appointments were made on regular basis by the Universities in the State of Maharashtra.**

4. **It appears that the dispute now only is with effect from which date the exemption will be granted by the University and with effect from which date the arrears of salaries will be paid to such teachers.**

5. The learned counsel for respondent no. 2 Organisation states that in all there are 13 demands including those which are enumerated in the affidavit dated 15 April 2013 of Dr. Tapati Mukhopadhyay, General Secretary of respondent no 2 organisation and some of the demands are already covered by the decisions of this Court in favour of teachers including Writ Petition No. 9218 of 2011 (SUTA Vs UGC & Ors.) and Writ Petition No. 11282 of 2011 (Awalekar Jotiba L & Ors. Vs UGC & Ors.)

6. In view of the above, further hearing of this Writ Petition is adjourned to 30 April 2013 **in order to enable the parties to amicably resolve the disputes.** The matter to be listed in the supplementary board.

**Chief Justice : M.S. Sanklecha, J**

This page was circulated on 21.04.2013. Reprinted for record purposes

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS ( [illegible] )**

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या शनिवार, दिनांक २० एप्रिल, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला ठराव

**१.** राज्याचे मा. उच्च शिक्षणमंत्री, मा. राज्यमंत्री यांनी काल दिनांक १९ एप्रिल, २०१३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी आंदोलनामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्वच प्रश्नांच्या बाबतीत तपशीलवार चर्चा केली.

**२.** केंद्राकडून सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची ८० टक्के रक्कम एकमुस्त प्रथम अदा करावी लागेल, ही गोष्ट त्यांना पूर्णपणे समजली आहे हे या चर्चेवरून स्पष्ट दिसून आले, पण "**याबाबत मंत्रिमंडळाच्या स्तरावर थकबाकी अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय झालेला आहे.**" असे ते नमूद करू शकले नाहीत. याचे कारण तसा निर्णय झालेला नाही हे उघड आहे.

**२.१** "ही संपूर्ण रक्कम एकाचवेळी **देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे** असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे", असा स्पष्ट उल्लेख असलेले दिनांक ८ एप्रिल, २०१३ रोजी एक विशेष वृत्त क्रमांक ५२१ शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आले होते. ते मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या संमतीनंतरच प्रकाशित करण्यात आले होते ही गोष्ट आजच्या चर्चेत स्पष्ट झाली.

**२.२** अगोदरच्या दिवशी म्हणजे १८ एप्रिल, २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयामध्ये सुद्धा १५०० कोटी रुपयांचा निर्णय मंत्रिमंडळाच्या स्तरावर झालेला आहे, असे शपथपत्र शासनाच्या वतीने दाखल करण्यात आले नाही तर ५०० कोटी रुपयाचाच निर्णय मंत्रिमंडळात मंजूर झाल्याचे सांगितले गेल्याची बाब सर्व महाराष्ट्राला ज्ञात झालेली आहे.

**२.३** उपरोक्त घटनाक्रम लक्षात घेता १५०० कोटी रुपयाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने मान्य केलेला आहे हे नमूद करण्यास ते तयार नव्हते.

**३.** नेटसेट मुक्त अशा जवळ जवळ १० हजार शिक्षकांची सेवा १२ ते २१ वर्षे झालेली असून त्यांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी सेवा धरण्याचा एक लाभ सोडला तर इतर सर्व लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून आज अस्तित्वात असलेल्या कायद्याने, परिनियमांनी व शासननिर्णयांनी उपलब्ध झालेले आहेत व मिळत आहेत. वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी सुद्धा त्यांची सेवा धरली जावी असे केंद्र शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व खुद्द महाराष्ट्र शासनाचे जिवंत शासननिर्णय असतांना महाराष्ट्रातच फक्त ही सेवा धरली जात नाही. **याबद्दल आंदोलन सुरू असतांना सर्व प्रयोजनासाठी त्यांची सेवा उद्यापासून धरण्याची शब्दरचना उच्च शिक्षण विभागाने दिनांक ७ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे.** ६ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळाच्या त्या निर्णयाची जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल तेव्हा त्यांना यापूर्वी मिळालेल्या सर्व वेतनवाढी परत घ्याव्या लागतील, पहिली वेतनवाढ त्यांना २०१४ मध्ये मिळेल, त्या सर्वांना मिळणारे निवृत्तीवेतनाचे लाभ रद्द होतील, ज्या निवडसमितीमार्फत त्यांची १५-२० वर्षापूर्वी निवड झाली आहे, तो निवडसमितीचा अहवाल रद्द होईल, त्यांच्या निवडीला मा. कुलगुरुंनी दिलेली मान्यता रद्द होईल, त्यांचे सेवेतील कन्फर्मेशन सुद्धा उक्त निर्णयाने रद्दबादल होईल. पीएच.डी., एम्.फिल. व प्रत्यक्षात नेट-सेट झालेल्या अशा प्रत्येक शिक्षकाची सेवा २०१३ पासूनच मोजली जाईल. एवढेच नव्हे तर ज्यांची सुरुवातीपासूनची सेवा धरून शेकडो ठिकाणी प्राचार्य म्हणून निवड झालेली आहे ती प्रत्येक निवड रद्द होईल. **शासननिर्णय काढून या सर्वांची "२०१३ मध्ये नेमणूक झाली आहे" असे जाहीर करणे हे पूर्णपणे बेकायदेशिरपणाचे होईल.** या निर्णयाचे असे परिणाम होतील ही गोष्ट त्यावेळी आमच्या लक्षात आली नाही असे मंत्रिमहोदयांनी मान्य केले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर असे करणे हे "बॅड इन लॉ" होईल. एवढेच सांगून ते थांबले नाहीत तर त्यासाठी आम्ही दुरुस्ती करू व **त्यासाठीचा प्रस्ताव यथावकाश आपण मंत्रिमंडळासमोर ठेवू असेही त्यांनी सांगितले.**

**४.** इतर सर्व मागण्यांच्या बाबतीत चर्चा झाली. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली असली तरी याबाबत कोणताही निर्णय शासनाच्या पातळीवर अंतिम झालेला नाही हे स्पष्ट दिसून येत होते. **याबाबत आपण प्रस्ताव तयार करून यथावकाश मंत्रिमंडळासमोर ठेवू एवढेच ते सांगत होते.**

**५.** मंत्रिमंडळाच्या समोर प्रस्ताव ठेवणे एवढेच माझे काम आहे, ते प्रस्ताव मंत्रिडळात मान्य होतील किंवा नाही याबाबत मी काहीच सांगू शकत नाही असे मा. उच्च शिक्षणमंत्री चर्चेच्या वेळी वारंवार सांगत होते. शासनाच्या पातळीवर जे प्रस्ताव अंतिम झालेले नाहीत, मंत्रिमंडळासमोर तथावकाश ठेवल्या जाणाऱ्या अशा प्रस्तावांच्या (निर्णयाच्या नव्हे) आधारे आंदोलन थांबविण्याबाबतचा निर्णय हे कार्यकारी मंडळ घेवू शकत नाही.

**६.** दंडशक्तीचा विधिमय वापर करण्याचा एकाधिकार ज्या शासनाला कायद्यानेच बहाल केलेला आहे त्या शासनाने शिक्षक-कर्मचाऱ्यांचे आंदोलन किंवा कोणतेही आंदोलन मोडून काढण्यासाठी फसवणूक आणि विश्वासघात या मार्गाचा वापर करण्याचा निर्णय घेतला असेल तर लोकशाही व्यवस्थेमध्ये ती गोष्ट अत्यंत निकृष्ट व टाकावू समजली गेली पाहिजे. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या बैठकीमध्ये जे लेखी आश्वासन दिले व ज्याच्या आधारावर या महासंघाने त्यावेळी एकतर्फी आंदोलन मागे घेतले त्या लिखित आश्वासनाची अंमलबजावणी न होण्यामुळे आपली फसवणूक व विश्वासघात झाल्याची तीव्र भावना उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये आज पसरली आहे. दमनशक्तीच्या आधारावर फसवणुकीच्या व विश्वासघाताच्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ठामपणे व निर्धारपूर्वक विरोध करण्याचा निर्णय या महासंघाच्या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच घेतला असल्याचे पुनश्च नमूद करण्यात येत आहे.

**७.** याबाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे की, दिनांक १६ सप्टेंबर, २०१२ रोजी महासंघाने **आंदोलनाचा ठराव** संमत केला व तो ताबडतोबच शासनास सादर करण्यात आला. त्यानुसार दिनांक १० ऑक्टोबर २०१२ रोजी आझाद मैदान मुंबई येथे **राज्यस्तरीय धरणे आंदोलन** करण्यात आले. दिनांक ५ नोव्हेंबर २०१२ रोजी पुणे येथे उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर **राज्यस्तरीय मोर्चाचे आयोजन** करण्यात आले. दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात एक दिवस **लाक्षणिक उपोषण** करण्यात आले. दिनांक १३ जानेवारी, २०१३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने विद्यापीठ संचलित महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षांच्या सर्व कामकाजावर **असहकार आंदोलनाचा निर्णय** घेतला व तो तावडतोब शासनास सादर करण्यात आला. दिनांक ८ मार्च, २०१३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे राज्यस्तरीय **'जेलभरो' आंदोलन** करण्यात आले. दिनांक १६ सप्टेंबर, २०१२ पासून आजपर्यंतच्या म्हणजे ७-८ महिन्यांच्या कालावधीत विविध निवेदनांच्या व आंदोलनाच्या माध्यमातून अनेक दिवसापासून प्रलंबीत असणाऱ्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा या महासंघाने प्रयत्न केला. दुर्दैवाने विद्यार्थी, शिक्षक व एकूणच उच्च शिक्षणाविषयी नोकरशाहीच्या आकसपूर्ण भूमिकेमुळे उच्च शिक्षण विभागात कोणतेही निर्णय अंतिम होऊ शकले नाहीत याचे या कार्यकारी मंडळाला तीव्र दुःख होत आहे. **आता इतक्या प्रदिर्घ कालावधीनंतर यथावकाश प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडला जाईल असे प्रत्येक बाबतीत सांगण्यात येत आहे.** विद्यार्थी, समाज, प्राध्यापक व उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये त्यामुळे तीव्र असंतोष पसरला असून या आकसपूर्ण वृत्तीचा निषेध करण्यासाठी **गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे दुपारी १२ ते ४ या वेळेत राज्यस्तरीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय महासंघाने घेतला आहे.**

**(प्रा.शिवाजीराव पाटील)** — *अध्यक्ष*
**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*
MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

***गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे दुपारी १२ ते ४ या वेळेत राज्यस्तरीय धरणे आंदोलन***

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

( ▯▯▯▯▯▯ )

# दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी शासनाने घेतलेल्या निर्णयातील बेकायदेशीर व क्रौर्यपूर्ण विषारी कृतींच्या माघारीनंतरच आंदोलनाच्या माघारीचा विचार होवू शकतो

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी
मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला ठराव

**१.** सात आठ महिन्यापूर्वी या महासंघाने ज्या आंदोलनाची राज्यशासनाला सूचना दिली त्या आंदोलनामध्ये अंतर्भूत, लहानमोठा अर्थभार समाविष्ट असलेल्या प्रत्येक मागणीबाबत "यथावकाश मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात येईल" अशी व अशीच शासनाची भूमिका आजपावेतो आहे. **"एकमुस्त थकबाकी अदा करा. आम्ही ८० टक्के अर्थभाराचा परतावा द्यायला तयार आहोत"** असे केंद्र शासन वारंवार सांगत असतांना उच्च शिक्षण विभागातर्फे मात्र अधिकृत पत्रक काढून **"ही संपूर्ण रक्कम एकाच वेळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे"** असे जाहीर करण्यात येत होते व येत आहे.

**२.** आता आम्ही ३० एप्रिल २०१३ पर्यंत सर्व थकबाकी एक-रकमी अदा करणार आहोत असे मा. उच्च शिक्षणमंत्री वृत्तवाहिन्यांना व चित्रवाहिन्यांना सांगत आहेत. याबाबतीत व इतरही बाबतीत यापूर्वी वेळोवेळी शासनातर्फे लेखी लिहून देण्यात आले त्याचे जे धिंडवडे झाले ते लक्षात घेता कदाचित त्यांनी आपला निर्णय संघटनेला लेखी कळविला नसेल. याउपर ३० एप्रिल २०१३ पर्यंत ते सारी थकबाकी अदा करतील असे गृहित धरले व केंद्र शासन गेल्या अनेक महिन्यापासून जो निधी द्यायला तयार आहे तो देण्याचे काम ३० एप्रिल २०१३ पर्यंत त्यांनी पार पाडल्याने ६ मार्च २०१३ रोजी शासनाने नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत जो निर्णय घेतला त्याच्या क्रौर्यपूर्ण विषारी परिणामांवर पांघरूण घालण्यात आपण यशस्वी होवू हा उच्च शिक्षण मंत्र्यांचा विश्वास निरर्थक व अनाठायी आहे.

**३.** थकबाकीची रक्कम आपण अदा केली की मग आपण आंघोळ करायला मोकळे झालो हा मा. उच्च शिक्षण मंत्र्यांचा समज चुकीचा आहे. १० हजार नेटसेट मुक्त शिक्षकांचाच प्रश्न मग त्यामुळे शिल्लक राहतो. हे १० हजार लोक तडफडत राहतील व सारे ज्येष्ठ शिक्षक आंदोलनातून माघार घेतील हे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांचे आकलन अत्यंत अनाकलनीय असून भ्रामक आहे. **दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी शासनाने नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयातील बेकायदेशीर व कौर्यपूर्ण विषारी कृति ह्या साऱ्या महाराष्ट्राच्या लक्षात आलेल्या आहेत. त्या कृतींच्या माघारीनंतरच आंदोलनाच्या माघारीचा विचार होवू शकतो हे एक व दुसरे म्हणजे** साऱ्या महाराष्ट्राच्या हेही लक्षात आलेले आहे की, मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या अनेक निर्णयांची उच्च शिक्षण विभाग अंमलबजावणी करीत नाही. अनेक बाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी अनेकदा निर्णय देवून अनेक महिने त्याची अंमलबजावणी होत नाही. अवमान याचिका दाखल होतात, प्रधान सचिव उच्च न्यायालयात जावून बिनाशर्त क्षमा मागतात, पण अंमलबजावणीचा शासननिर्णय मात्र निघत नाही. आता तर मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरसुद्धा अशा अनेक बाबी दुर्दैवाने आंदोलनाच्या मागणीपत्रात समाविष्ट करूनसुद्धा व एवढे आंदोलन होवूनसुद्धा शासन काहीच कारवाई करीत नाही. उच्च शिक्षण विभागाच्या उपरोक्त हालचालीची चाहूल लागल्यामुळे ठिकठिकाणी गेल्या १५ दिवसात ज्येष्ठ शिक्षकांनी सभा घेऊन आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांना धीर दिला. आंदोलनामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींच्या संख्येबरोबरच आंदोलनात असलेल्या मागण्यांच्या गुणवत्तेचे सुद्धा तितकेच महत्त्व असते. उपरोक्त दोनही बाबतीत शासनाला आपली चूक निश्चितच लक्षात येईल व तोपर्यंत एकजुटीने आंदोलनातील सर्वांचा सहभाग ठाम राहील असे विचार या ज्येष्ठ शिक्षकांनी या सभांमधून मांडले. ज्येष्ठ शिक्षकांच्या आंदोलनातील सहभागाविषयीचे शासनाचे आकलन किती चुकीचे आहे हे शासनाला जितक्या लवकर कळेल तेवढे ते सर्वांच्या हिताचे होय.

**४.** दिनांक ७ मार्च २०१३ या तारखेचे जे शासकीय पत्र संघटनेच्या अध्यक्षांना प्राप्त झाले त्यामध्ये नेटसेट मुक्त शिक्षकांबाबत शासनाने ६ मार्च २०१३ रोजी घेतलेला निर्णय पुढील प्रमाणे (शब्दशः) नमुद आहे.:- "**दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा विनिर्दिष्ट अटींच्या अधीन राहून शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे.**" ही शब्दरचना कोणताही चष्मा लावून कितीही वेळा वाचली तरी दिनांक १९.०९.१९९१ ते दिनांक ०३.०४.२००० या कालावधीतील मुळातील सर्व बिगर नेटसेट असलेले शिक्षक त्यामध्ये समाविष्ट आहेत हे स्पष्टपणे दिसून येते. त्यातून पुढे ज्यांनी पी.एचडी. किंवा एम्.फील. किंवा नेटसेट केलेले आहे ते शिक्षकही सुटलेले नाहीत. या सर्व नेटसेट मुक्त शिक्षकांचे वेगवेगळे वर्ग करण्याचे कोणतेही वाजवी कारण नाही, असे वाटल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे शासनानेसुद्धा त्या सर्वांसाठी एकच निर्णय घेतला असे दिसून येते

**५.** नेटसेट मुक्त अशा जवळ जवळ १० हजार शिक्षकांची सेवा १२ ते २१ वर्षे झालेली असून त्यांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी सेवा धरण्याचा एक लाभ सोडला तर इतर सर्व लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून आज अस्तित्वात असलेल्या कायद्याने, परिनियमांनी व शासननिर्णयांनी उपलब्ध झालेले आहेत व मिळत आहेत. वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी सुद्धा त्यांची सेवा धरली जावी असे केंद्र शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व खुद्द महाराष्ट्र शासनाचे जिवंत शासननिर्णय असतांना महाराष्ट्रातच फक्त ही सेवा धरली जात नाही. याबद्दल आंदोलन सुरू असतांना सर्व प्रयोजनासाठी त्यांची सेवा सन २०१३ पासून धरण्याची शब्दरचना उच्च शिक्षण विभागाने दिनांक ७ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे.

**६.** शासनाचा हा निर्णय अत्यंत क्रौर्यपूर्ण असून त्या निर्णयाचे अत्यंत क्रुर व विषारी परिणाम साऱ्या महाराष्ट्राला आता ज्ञात झालेले आहेत. या देशातील घटनेप्रमाणे कायद्याप्रमाणे सेवेत 'कन्फर्म' असलेल्या अशा प्रत्येक शिक्षकाचे लाभ

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : १

*"दिनांक १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेटसेट अध्यापकांच्या संदर्भात दिनांक ६.३.२०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. सदर बैठकीत ज्या दिनांकापासून शासन निर्णय निर्गमित होईल त्या दिनांकापासून त्यांच्या सेवा ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करण्यात येतील असा निर्णय झालेला आहे."*

- मा. राज्यमंत्री, उच्च शिक्षण यांनी शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (A-4)

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : २

*६ मार्च २०१३ रोजीच्या शासनाच्या त्या निर्णयाची जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल तेव्हा (१) यापूर्वी मिळालेल्या सर्व वेतनवाढी परत घ्याव्या लागतील, पहिली वेतनवाढ त्यांना २०१४ मध्ये मिळेल, (२) त्या सर्वांना मिळणारे व मिळत असलेले निवृत्तीवेतनाचे लाभ रद्द होतील, (३) ज्या निवडसमितीमार्फत त्यांची १५-२० वर्षापूर्वी निवड झाली आहे, तो निवडसमितीचा अहवाल रद्द होईल, (४) त्यांच्या निवडीला मा. कुलगुरुंनी दिलेली मान्यता रद्द होईल, (५) त्यांचे सेवेतील कन्फर्मेशन सुद्धा उक्त निर्णयाने रद्दबादल होईल.*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेल्या ठरावाचा परिच्छेद ६ पहा

कारणे दाखवा नोटीस न देता, त्याचे म्हणणे ऐकून न घेता काढून घेता येत नाहीत हा भाग वेगळा. ६ मार्च २०१३ रोजीच्या शासनाच्या त्या निर्णयाची जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल तेव्हा (१) यापूर्वी मिळालेल्या सर्व वेतनवाढी परत घ्याव्या लागतील, पहिली वेतनवाढ त्यांना २०१४ मध्ये मिळेल, (२) त्या सर्वांना मिळणारे व मिळत असलेले निवृत्तीवेतनाचे लाभ रद्द होतील, (३) ज्या निवडसमितीमार्फत त्यांची १५-२० वर्षापूर्वी निवड झाली आहे, तो निवडसमितीचा अहवाल रद्द होईल, (४) त्यांच्या निवडीला मा. कुलगुरुंनी दिलेली मान्यता रद्द होईल, (५) त्यांचे सेवेतील कन्फर्मेशन सुद्धा उक्त निर्णयाने रद्दबादल होईल. (६) पीएच.डी., एम्.फिल. व प्रत्यक्षात नेट-सेट झालेल्या अशा प्रत्येक शिक्षकाची सेवा २०१३ पासूनच मोजली जाईल. (७) एवढेच नव्हे तर ज्यांची सुरुवातीपासूनची सेवा धरून शेकडो ठिकाणी प्राचार्य म्हणून निवड झालेली आहे ती प्रत्येक निवड रद्द होईल. शासननिर्णय काढून या सर्वांची "२०१३ मध्ये नेमणूक झाली आहे" असे जाहीर करणे हे पूर्णपणे बेकायदेशिरपणाचे होईल. या निर्णयाचे असे परिणाम होतील ही गोष्ट त्यावेळी आमच्या लक्षात आली नाही असे मंत्रिमहोदयांनी मान्य केले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर असे करणे हे "बॅड इन लॉ" होईल. एवढेच सांगून ते थांबले नाहीत तर त्यासाठी आम्ही दुरुस्ती करू व **त्यासाठीचा प्रस्ताव यथावकाश आपण मंत्रिमंडळासमोर ठेवू असेही त्यांनी सांगितले.**

**७.** या कौर्यपूर्ण कृत्यांचा महाराष्ट्रभर एवढा बभ्रा झाला की मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना अधिकृतपणे माहीती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे पत्रक काढून "**पुढील दोन प्रस्ताव यथावकाश मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहेत.** :-

बिगर नेटसेट अध्यापकांनी विहित शैक्षणिक अर्हता दरम्यानच्या कालावधीत प्राप्त केली असल्यास त्यांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिकरित्या (नोशनल) ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करणे, तसेच ज्या अध्यापकांनी अद्यापही विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली नाही अशा अध्यापकांना अर्हता प्राप्त करण्यासाठी पुढील तीन वर्षांची संधी देऊन, या कालावधीत ते ज्या दिनांकास अर्हता प्राप्त करतील त्या दिनांकास त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिकरित्या (नोशनल) सेवा ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करणे." असे जाहिर करावे लागले. हे जे दोन प्रस्ताव मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी प्रसिद्धीला दिलेले आहे त्यात अनेक दोष असले तर दिनांक ६ मार्च २०१३ चा निर्णय अत्यंत क्रौर्यपूर्ण असल्याचे त्यांच्या लक्षात आले हे या दोन प्रस्तावावरून स्पष्ट होते. ठेवण्यात येणार असलेले प्रस्ताव यापूर्वी देण्यात आलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता करणारे नाहीत हे कोणाच्याही चटकन लक्षात येईल.

**८.** या सर्व शिक्षकांची सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून धरली पाहिजे असा जो निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेला आहे त्याची कायदेशीर स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. सन १९९१ चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन हे ४ एप्रिल २००० पर्यंत अस्तित्वात होते. त्याच काळात हे शिक्षक सेवेत आलेले आहेत. **सन १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सर्व बाजूंनी जोरदार युक्तीवाद झालेत व त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने देशभरासाठी १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरुप निश्चित करणारा निर्णय दिला व भारतात आज हा या विषयावरील कायद्याचा अर्थ सांगणारा अंतिम शब्द आहे.**

८.१ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरुप स्पष्ट करणारा मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ सप्टेबर १९९४ रोजी सिव्हील अपिल नं. १८१९ ऑफ १९९४ मध्ये (Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336) जो अंतिम निर्णय दिला आहे, त्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात परिच्छेद २१ मध्ये पुढील महत्वाचा भाग समाविष्ट आहे. :-

"**i) recommendatory :** The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.

**ii) application prospective :** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective."

सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा जो निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला त्यानुसार हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा राज्य शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम केल्यानंतरच्या काळात लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

८.२ महाराष्ट्रात ही पात्रता सन २००० च्या सुरुवातीला लागू करण्यात

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ३

*''कॅबिनेटच्या निर्णयानुसार ज्या दिवसापासून शासन निर्णय निर्गमित होईल त्या दिनांकापासून, त्या दिवसापासून त्यांना नियमित पगार दिले जातील. अनुषंगिक लाभही शासन निर्णय निर्गमित झालेल्या तारखेपासूनच मिळतील तसेच त्यांचे जे स्केल आहे ते स्केल त्या दिवसापासून लागू होतील व त्यांच्या सेवा नियमित होतील असा निर्णय झालेला आहे.''*

मा. राज्यमंत्री, उच्च शिक्षण यांनी शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (B-1)

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ४

*६ मार्च २०१३ रोजीच्या शासनाच्या त्या निर्णयाची जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल तेव्हा ..... (६) पीएच.डी., एम्.फिल. व प्रत्यक्षात नेट-सेट झालेल्या अशा प्रत्येक शिक्षकाची सेवा २०१३ पासूनच मोजली जाईल. (७) एवढेच नव्हे तर ज्यांची सुरुवातीपासूनची सेवा धरून शेकडो ठिकाणी प्राचार्य म्हणून निवड झालेली आहे ती प्रत्येक निवड रद्द होईल. शासननिर्णय काढून या सर्वांची ''२०१३ मध्ये नेमणूक झाली आहे'' असे जाहीर करणे हे पूर्णपणे बेकायदेशिरपणाचे होईल. या निर्णयाचे असे परिणाम होतील ही गोष्ट त्यावेळी आमच्या लक्षात आली नाही, असे मंत्रिमहोदयांनी मान्य केले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर असे करणे हे ''बॅड इन लॉ'' होईल. एवढेच सांगून ते थांबले नाहीत तर त्यासाठी आम्ही दुरुस्ती करू व* ***त्यासाठीचा प्रस्ताव यथावकाश आपण मंत्रिमंडळासमोर ठेवू असेही त्यांनी सांगितले.***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरूवार, दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेल्या ठरावाचा परिच्छेद ६ पहा

आली हे सर्वांनाच ठाऊक आहे. इतक्याउपर ही प्रकरणे जबरीने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात आली. मग आता याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झमशन बाबत एकदा आपल्या ११ मे २०१२ च्या पत्रान्वये राज्य शासनाला "The factual position on the subject is given as under :- The actual date of grant of exemption shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000. " असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. कारण याच प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ पूढील प्रमाणे आहे.:-

" 24.... As analyzed above, therefore the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval, in which event it would if it failed to show cause for it's failure to abide by the said Regulations to the satisfaction of the UGC, forfeit its grant from the U.G.C. If however it did show cause to the satisfaction of the U.G.C., **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized."**

८.३ थोडक्यात सांगावयाचे तर विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट-सेट मुक्ततेबाबत एकदा मान्यता मिळाली की या शिक्षकांच्या सेवा तर नियमित होतीलच पण **त्यांच्या वेतनावरील केंद्राचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुज्ञेय अनुदान सुद्धा त्यांना मिळेल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे.** शब्दशः पुढील प्रमाणे :- "..... it not only would not forfeit its grant but the appointment made **without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized.**"

९. दिनांक १६ सप्टेंबर, २०१२ रोजी महासंघाने **आंदोलनाचा ठराव** संमत केला व तो ताबडतोबच शासनास सादर करण्यात आला. विशेष गोष्ट अशी की लहान मोठा आर्थिक भार असलेल्या प्रत्येक बाबतीत उच्च शिक्षण विभागाकडून गेल्या ७ महिन्यात एकही निर्णय घेतलेला नाही. अशा प्रत्येक मुद्यांच्या बाबतीत आजही "**प्रस्ताव यथावकाश मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येणार आहे**" एवढा एकच मंत्र जपला जात आहे. अनेक बाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी अनेक निर्णय दिल्यानंतरसुद्धा शासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही अशा मागण्यासुद्धा संघटनेच्या मागणी पत्रात समाविष्ट असून त्याबाबतसुद्धा शासन कोणताही निर्णय घ्यायला तयार नाही. निवडश्रेणीमध्ये ५ वर्षाची सेवा झाल्यानंतर १४९४० च्या टप्प्यावर वेतननिश्चिती केली पाहिजे असा विद्यापीठ अनुदान आयोगाचा व केंद्र शासनाचा नियम होता. त्याप्रमाणे महाराष्ट्रात शासननिर्णय निर्गमित झाला. शेकडो शिक्षकांना १४९४० च्या टप्प्यावर अशा रीतीने वेतननिश्चिती देण्यात आली. पण पुढे पुढे याबाबतीत काहींना देऊ, काहींना देणार नाही असा प्रकार सुरू झाला. त्यातून काही ठिकाणी रिकव्हऱ्या सुरू झाल्या त्यातून कोर्ट कचेऱ्या सुरू झाल्या.

(१) अशाच एका रिकव्हरीच्या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक १६ मार्च २००७ रोजी २००७ च्या याचिका क्रमांक १६६ मध्ये रिकव्हरीवर मनाई हुकूम बजावतांना दिलेल्या निर्णयात पुढील प्रमाणे नमुद केले. :-

"Our attention was invited to the judgement of the kerala High Court in O.P. No. 36112 of 2002, dated 20.12.2000, wherein in the similar circumstances, the Kerala High Court issued direction to the central Government and UGC to consider the case of extensions of benefits to such lecturers and pursuant to which now the benefits have been extended in terms of the original G.R. dated 11 th December, 1999 read

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ५

''सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, हे शिक्षक गेल्या २३-२४ वर्षापासून कार्यरत आहेत. परंतु आम्ही शासनाच्या बाजूने असा विचार करतो की, जे २३ वर्षातही कॉलीफाय होऊ शकले नाहीत असे असतांनाही शासन त्यांना काढण्याची भाषा करीत नाही, उलट त्यांची सेवा युजीसीच्या सांगण्यावरून सुरळीत सुरु ठेवलेल्या आहेत. खरे म्हणजे जे २३ वर्षात कॉलीफाय होऊ शकले नाही त्यांच्याबाबत शासन वेगळा विचार करु शकले असते परंतु शासनाने तसे केले नाही.''

मा. राज्यमंत्री, उच्च शिक्षण यांनी शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (B-2)

with the Resolution of the Government of India and UGC we also informed that the similar benefits have been extended to the state of Uttar Pradesh."

(२) पुढे अशी अनेक प्रकरणे मा. उच्च न्यायालयात गेलीत "Shivaji University Teachers Association and Ors. Petitioners ***VS.*** The UGC and Ors " या प्रकरणात दिनांक ८ एप्रिल २०११ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ३३२४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"Accordingly, we dispose of this petition on the same terms as in the case of University Grants Commission Vs. B. J. Vincent,Muttikkal House,Sakthi and Ors. in W.A.No.1394/2008 and companion matters(Kerala Highcourt at Kenakulam) . In other words the Writ Petition is made absolute in terms of prayer clause a and b with no order as to costs." या प्रकरणात 'प्रेअर क्लॉज' ए व बी पुढील प्रमाणे होता.

"(a) That by Writ of Mandamus and/or by appropriate Writ,Direction and Order,Your Lordship be pleased to direct the Respondents to give the benefits of fixing pay at minimum of Rs.14940/-upon completion of five years from the dates with effect from which they were placed in the Selection grade and particularly mentioned in Exhibit A .

(b) That by Writ of Mandamus and/or by appropriate Writ,Direction and order, Your Lordship be pleased to direct the Respondents to implement the Career Advancement Scheme with effect from 1.1.1996 and to give the benefit of fixation of pay at minimum Rs.14,940/- and consequent increments as provided under the scheme."

(३) दिनांक २९ फेब्रुवारी २०१२ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०११ च्या याचिका क्रमांक ९२१८ मध्ये अशाच प्रकारचा निर्णय दिला व असा निर्णय देतांना परिच्छेद ७ मध्ये पुन्हा पुन्हा अशीच प्रकरणे न्यायालयात कां येत आहेत याबद्दल आश्चर्य व्यक्त केले व सारख्या प्रकरणी सारखा न्याय लागू करणारा शासननिर्णय निर्गमित करण्याचे शासनाला आदेश दिलेत.

(४) शासन काहीच निर्णय घेत नसल्याने एकदा निकाल झाल्यावर सुद्धा अनेक शिक्षकांना मा. उच्च न्यायालयात जावे लागले होते, लागत होते. दिनांक २० मार्च २०१२ रोजी सन २०११ च्या याचिका क्रमांक ४४७५ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने पुढील प्रमाणे आदेश पारित केलेत. :-

"We make it clear that, if the Secretary of both the above named Departments fail to file affidavit assuring the Court that remedial and corrective steps will be taken forthwith before the next date, the Court may have to consider of initiating appropriate proceedings, " व याच याचिकाकर्त्यांना याच प्रकरणात पुढे दिनांक १३ एप्रिल २०१२ रोजी पुढील शब्दात मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिला. :-

**"The Petition is allowed on the same terms as in Writ Petition 9218 of 2011 and companion matters."**

(५) शासन जागचे हलायला तयारच नव्हते. औरंगाबाद खंडपीठासमोरसुद्धा अशी अनेक प्रकरणे गेलीत. दिनांक २७ एप्रिल २०१२ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २०११ च्या याचिका क्रमांक ६८९४ मध्ये पुढील प्रमाणे आदेश दिला. :-

"In the light of the judgment of the Division Bench of this Court, dated 8.4.2011 in Writ Petition No.3324 of 2010, Shivaji University Teachers Association and Ors., Vs. The University Grants Commission and Ors., **we allow this petition and make Rule absolute in terms of Prayer Clauses (A-1) and (A-2) with no orders as to costs. We further direct the respondents to disburse the benefits to the petitioners, as expeditiously as possible.**" या प्रकरणातील 'प्रेअर क्लॉज' '(A-1) व (A-2) पुढील प्रमाणे :-

"(A-1) That by writ of mandamus and/or by appropriate writ, direction and order, your Lordship be pleased to direct the Respondents to give the benefits of fixing pay at minimum of Rs.14940/- upon completion of five years from the dates with effect from which they were placed in selection grade and particularly mentioned in Exh. A ;

(A-2) That by writ of mandamus and/or writ, direction and order, Your Lordship be pleased to direct the Respondents to implement the Career Advancement Scheme with effect from 1.1.1996 and to give the benefit of fixation of pay at minimum of Rs.14,940/- and consequent increments as provided under the scheme."

(६) एक सारख्या प्रकरणामध्ये वारंवार आदेश देऊनही शासन काहीच करीत नाही, त्यामुळे दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी मा. प्रधान सचिव उच्च शिक्षण यांना २०११ च्या ४४७५ या प्रकरणात शपथपत्र दाखल करून "At

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ६

*"गेल्या काळात जे अधिव्याख्याते नेटसेट एम्.फील. पी.एचडी. झालेले आहेत त्यांच्या संबंधी शासन नक्कीच वेगळ्याने विचार करीत आहे. येणाऱ्या काही काळामध्ये शासन स्तरावर त्याचा नक्कीच निर्णय होईल. अधिव्याख्याते नंतर कॉलीफाय झाले तर त्यासंबंधी शासन काय करणार आहे असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यासबंधीचा विचार आज तरी शासनासमोर नाही. आज फक्त त्यांच्या सर्व्हिसेस कायम करण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे. जे २० वर्षात घडले नाही ते पुढील २ वर्षात घडले तर नक्की यासबंधी वेगळा विचार करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.''*

मा. राज्यमंत्री उच्च शिक्षण यांनी मंगळवार, दिनांक १९ मार्च २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (C-2)

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ७

*"तरी सुद्धा दि. ६.३.२०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासन यांच्या सेवा संपुष्टात आणणार नाही, शासन ज्या दिवसापासून निर्णय घेईल त्या दिवसापासून त्यांना सर्व फायदे दिले जातील व आजपासून त्यांच्या सेवा नियमित केल्या जातील अशा प्रकारे निर्णय घेण्यात आला आहे."*

मा. राज्यमंत्री उच्च शिक्षण यांनी मंगळवार, दिनांक १९ मार्च २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (4C-1)

the outset, I am filing this affidavit with the limited purpose to express my unconditional apology for delay in implementing the order passed by this Hon'ble Court." असे न्यायालयासमोर नमुद करावे लागले.

(७) प्रत्यक्षात याचिकाकर्ते असलेल्या काही शिक्षकांना लाभ देण्यात आलेत पण तत्सम शिक्षकांना तत्सम लाभ देण्याचा शासननिर्णय संघटनेने वारंवार विनंती करुनही निर्गमित होत नव्हता. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोरसुद्धा अनेक प्रकरणे दाखल झालीत. दिनांक २९ नोव्हेंबर २०१२ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक ८५३ मध्ये आपल्या निर्णयात पुढील प्रमाणे पूर्व निर्णयाचा दाखला दिला. :-

"**The Division Bench of this Court had further held that the cut off date requiring the Teachers to have the said pay scale from 1.1.1996 would not be relevant, and it is only upon completion of five years service as Readers/Selection Grade Lecturers, the Teachers would be entitled to the payscale in that grade.** The various other Benches of this Court have also taken a similar view." व त्यानंतर पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"In view of above, the petition is allowed in terms of prayer clause (a). **The respondents are directed to fix the petitioners in the higher payscale upon their completion of five years service as Readers/Selection Grade Lecturers. Needless to say that the petitioners are entitled to consequential benefits upon fixation of the higher payscale.**"

(८) त्याच त्याच प्रकारच्या प्रकरणामध्ये पुन्हा पुन्हा शिक्षकांना न्यायालयात जावे लागत होते. शिक्षकांच्या व शासनाच्या हजारो रुपयांचा चुराडा होत होता. मा. न्यायालयाच्या अनेक खंडपीठांना अनेक तास शासनाच्या या दिरंगाईमुळे खर्च करावे लागत होते व आहेत. आज सुरु असलेल्या आंदोलनामध्ये क्रमांक ८ वर पुढील प्रमाणे मागणी आहे. :- "**मा. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल व पाचव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार शिक्षकांना रु. १४,९४० ही वेतनश्रेणी मंजूर करणे**" शासनाची या मागणीबाबतची ठोकळेबाज भूमिका "यथावकाश मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल."

**१०.** सेवेत असलेल्या शिक्षकांनी एम्फील किंवा पीएच.डी. ही पदवी १९९६ पूर्वी प्राप्त केली असेल तर त्याला एक, दोन आगावू वेतनवाढी देण्याची योजना केंद्र शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केली होती. महाराष्ट्रात त्याप्रमाणे शासननिर्णय निघाला अनेकांना अशा आगावू वेतनवाढी देण्यात आल्या. पुढे यांना देवू, त्यांना देणार नाही असा प्रकार सुरु झाला. काही ठिकाणी रिकव्हऱ्या काढण्याचाही प्रकार झाला. मा. केरळ उच्च न्यायालयासमोर २० जून २००३ रोजी २००१ च्या याचिका क्रमांक ३२७२७ मध्ये त्या न्यायालयाने "**Persons who acquired Ph. D. before 1.1.1996 are eligible to get two advance increments w.e.f. 1.1.1996.**" असा निर्णय दिला.

(१०.१) महाराष्ट्रात सुद्धा अनेक प्रकरणे मा. उच्च न्यायालयाच्यासमोर गेलीत. दिनांक १ जुलै २००५ रोजी सन २००३ च्या याचिका क्रमांक १०८४ मध्ये नागपूर खंडपीठातील मा. न्यायमुर्तीनी सरळसरळ सरकारी वकीलांनाच केरळमधील निकालाबाबत पुढील शब्दात माहीती देण्याविषयी सांगितले.

"We have granted time to the learned AGP appearing on behalf of the respondents No.l to 3 to verify this aspect and make submissions in this regard, as to whether the issue in the Writ Petition Stands concluded by the decision of the Kerala High Court referred to herein above. **Learned AGP after verifying the facts of the present case as well as the decision of the Kerala High Court, makes a categorical statement before us that the issue stands concluded by the above referred decision of Kerala High Court.**" व शेवटी या प्रकरणात पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"In the Backdrop of the above referred facts, since it is

## क्रौर्य याच्यापेक्षा वेगळे काय असते ? : ८

*"सभापती महोदय, आम्ही कॅबिनेटपुढे प्रस्ताव घेऊन गेलो आहोत. कॅबिनेटसमोरील प्रस्तावात तीन ऑप्शन अंतर्भूत केलेले आहेत. केव्हापासून सेवा ग्राह्य धरायची? थकबाकी न देता सेवा ग्राह्य धरायची की थकबाकीसह ग्राह्य धरायची आणि तिसरा पर्याय कॅबिनेट ज्या तारखेपासून निर्णय घेईल त्या तारखेपासून त्याच्या सेवा रेग्युलर धराव्यात किंवा कॅसचे बेनिफिट त्यांना द्यावेत कॅबिनेटने तिसरा निर्णय मान्य केला."*

मा. मंत्री उच्च शिक्षण यांनी मंगळवार, दिनांक २ एप्रिल २०१३ रोजी विधानपरिषदेत दिलेल्या उत्तरातून शब्दशः (3K-1)

not at all in dispute that the issue concluded by the above referred decision of the Kerala High Court, **We dispose of the present writ Petition with directions to the respondent No. 3 to grant two advance increments to the petitioners. w.e.f. 1.1. 1996,** including other consequential benefits, if any permissible in law. **Needless to mention that the intervenors are also entitled for the similar relief, if they fulfills the criteria of acquiring of Ph.D. before 1.1.1996.**"

(१०.२) आज सुरु असलेल्या आंदोलनामध्ये मागणी क्रमांक ९ ही पुढील प्रमाणे आहे **"दि. १.१.१९८६ ते ३१.५.१९९५ या कालावधीतील पीएच.डी. व एम्.फिल. धारकांना एच.आर.डी. व यू.जी.सी.च्या निदेशाप्रमाणे आगाऊ वेदनवाढी मंजूर करणे"** सन २००५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर ७ वर्षे त्याच्या समतुल्य अंमलबजावणीचे शासन आदेश निघू नयेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज या मागणीबाबत शासनाची ठोकळेबाज भूमिका "यथावकाश मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल" अशी आहे.

११. १५०० कोटी रूपये केंद्र शासन देण्यास तयार असतांना गेल्या अनेक महिन्यापासून या प्रश्नाकडे शासनाचे सातत्त्याने दुर्लक्ष झाले. आता ३० एप्रिल २०१३ पर्यंत थकबाकीची ही सर्व रक्कम प्रत्यक्षात अदा केली जाईल असे जाहिरपणे मा. उच्च शिक्षणमंत्री सांगत आहेत ते खरे मानले तरी दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी शासनाने नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयातील बेकायदेशीर व क्रौर्यपूर्ण विषारी कृतींच्या माघारीनंतरच आंदोलनाच्या माघारीचा विचार होवू शकतो. आणखी महत्त्वाची बाब म्हणजे मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या अनेक निर्णयांच्या बाबत अनेक खंडपीठांनी अनेकदा निर्णय देवून अनेक महिने त्याची अंमलबजावणी होत नाही ही गोष्ट गांभीर्याने घेण्याची असून कोणत्याही शासनाची प्रतिष्ठा वाढविणारी नाही. आंदोलनाच्या मागणीपत्रात ही बाब समाविष्ट करावी लागणे हे दुर्दैवी असले तरी शासन अजूनही त्याबाबत काहीच कारवाई करीत नाही हे अति दुर्दैवी होय.

१२. दंडशक्तीचा विधिमय वापर करण्याचा एकाधिकार ज्या शासनाला कायद्यानेच बहाल केलेला आहे त्या शासनाने शिक्षक-कर्मचाऱ्यांचे आंदोलन किंवा कोणतेही आंदोलन मोडून काढण्यासाठी फसवणूक आणि विश्वासघात या मार्गाचा वापर करण्याचा निर्णय घेतला असेल तर लोकशाही व्यवस्थेमध्ये ती गोष्ट अत्यंत निकृष्ट व टाकावू समजली गेली पाहिजे. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या बैठकीमध्ये जे लेखी आश्वासन दिले व ज्याच्या आधारावर या महासंघाने त्यावेळी एकतर्फी आंदोलन मागे घेतले त्या लिखित आश्वासनाची अंमलबजावणी न होण्यामुळे आपली फसवणूक व विश्वासघात झाल्याची तीव्र भावना उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये आज पसरली आहे. दमनशक्तीच्या आधारावर फसवणुकीच्या व विश्वासघाताच्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ठामपणे व निर्धारपूर्वक विरोध करण्याचा निर्णय या महासंघाच्या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच घेतला असल्याचे पुनश्च नमूद करण्यात येत आहे.

**(प्रा.शिवाजीराव पाटील)** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार सुरु असलेल्या आंदोलनाची सद्यस्थिती

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार सुरु असलेल्या आंदोलनाची सद्यस्थिती, मा. उच्च शिक्षणमंत्र्यासमवेत झालेली बैठक मा. उच्च न्यायालयासमेर झालेल्या घडामोडी, आझाद मैदानावरील धरणे आंदोलनापूर्वी व नंतर घडलेल्या घटनांबाबत माहिती देण्याकरीता नागपूर व अमरावती येथील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या विद्यापीठस्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्या प्रमाणे आहे. त्या त्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

### तक्ता

### नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, धनवटे नॅशनल कॉलेज, कॉंग्रेस नगर नागपूर | गुरूवार, दिनांक २ मे, २०१३ | सकाळी ११.०० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | बुधवार, दिनांक १ मे, २०१३ | दुपारी ४.०० वाजता |

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **01.05.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

---------------------------------------------------

To,.......................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................